SHIVAJI UNIVERISTY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000 website- www.unishivaji.ac.in
FAX 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333 – BOS - 2609094
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004.
दुरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (अभ्यास मंडळे विभाग– २६०९०९४)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.e-mail:bos@unishivaji.ac.in

Estd. 1962
NAAC 'A' Grade
MHRD NIRF-28th Rank

जा.क्र./एसयु/पात्रता/by mail दिनांक : 17/4/2020

प्रति,

मा. श्री. आ. ए. रायते,
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
मुंबई. 400001

मा. डॉ. धनराज माने,
शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट् राज्य, पुणे.

विषय – शैक्षणिक वर्ष 2019–20 मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अंतिम याद्यांबाबत.

महोदय,

आपणास विदितच आहे की, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश हे उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांचेमार्फत होत असतात. तदनंतर प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडून प्रवेशीत विद्यार्थ्यांची कागदपत्रे पडताळणी करुन अंतिम प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी शेरा व स्वाक्षरीसह महाविद्यालयांना दिली जाते. सदर यादी प्राप्त झालेनंतर विद्यापीठाकडून संबंधित अभ्यासक्रमाच्या पात्रता तपासून ऑनलाईन पात्रता अंतिम केल्या जातात. पात्रता अंतिम झालेशिवाय या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे निकाल जाहीर केले जात नाहीत.

शैक्षणिक वर्ष 2019–20 मधील विद्यार्थ्यांच्या प्रवेश पात्रतेबाबत विद्यापीठाने महाविद्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करुनही महाविद्यालयांनी प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडून प्राप्त प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठास सादर केलेली नाही. तसेच महाविद्यालयांनी अद्याप यादी प्राप्त झालेली नाही असे कळविले आहे.

सद्या कोव्हिड–19 चा प्रार्दुभाव पसरलेने देशात व राज्यात लॉकडाउन ची परिस्थिती आहे. मार्च/एप्रिल, 2020 मध्ये परीक्षा सुरु होणेपूर्वी विद्यार्थ्यांच्या पात्रता पडताळणी होवून पूर्ण करणे आवश्यक आहे. तरी सदर कामी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या प्राप्त व्हाव्यात/मिळाव्यात ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. विलास नांदवडेकर)
कुलसचिव

प्रत : मा. प्राचार्य, सर्व संलग्नित व्यवसायिक महाविद्यालये

d:\eligibility\mar letter 2017.doc